




दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून निघत असते व जे खूप तीव्र देखील असते, त्यात खूपच जास्ती सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...

– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम


वर्ष : ०५ | अंक : ७१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२५ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# काळाचौकी येथे भर रस्त्यात तरुणीवर वार करून तरुणाने स्वतःचा गळा चिरला...



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२४, मुंबई :** दीपावळीचा सण सुरु असतानाच भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी मुंबईतील लालबाग – काळाचौकी परिसरात संपूर्ण मुंबईला हादरवून सोडणारी घटना घडली आहे. एका तरुणीला भर रस्त्यात बेदम मारहाण करून तिच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. स्वतःचा बचाव करण्यासाठी ही तरुणी जवळच्या नर्सिंग होम मध्ये शिरली, हल्लेखोर तरुणाने तेथेही घुसून तिच्यावर जीवघेणा हल्ला करून स्वतः चा गळा चिरला. सदर घटनेनंतर दोघांना ही परळ येथील के. ई. एम. रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. प्रेमप्रकरणातून हा हल्ला झाल्याचे स्थानिक नागरिकांमध्ये बोलले जात आहे. मनिषावर हल्ला केल्यानंतर सोनूने स्वतःचं जीवन संपवलं होतं. गंभीर जखमी झालेल्या मनिषाला जे. जे. रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. मात्र हल्लूयात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने मनिषाची प्राणज्योत मालवली आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी रविवार पर्यंत ‘यलो अलर्ट’ जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार २४ ऑक्टोबर ते रविवार २६ ऑक्टोबर या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ‘यलो अलर्ट’जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. मेघगर्जनेच्या वेळी, विजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे त्यांनी म्हटले आहे.

# मुंबई मेट्रो लवकरच ‘गेटवे ऑफ इंडिया’ पर्यंत धावणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२४, मुंबई :** आरे भुयारी मेट्रो ३’ मार्गिका दि.९ऑक्टोबरपासून पूर्ण क्षमतेने, आरे– कफ परेडदरम्यान धावू लागली आहे. या मार्गिकेवरील आरे– आचार्य अत्रे चौक टप्प्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र, ’मेट्रो ३’ पूर्ण क्षमतेने धावू लागल्यानंतर प्रवासी संख्येत सातत्याने वाढ होत आहे. या मेट्रोलाईनवर दररोज दीड लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करत आहेत. दक्षिण मुंबईतील उडचढ मेट्रो स्थानकावर प्रवाशांची सर्वाधिक गर्दी पहायला मिळते. आता हेच सीएसएमटी मेट्रो स्टेशन गेम चेंजर ठरणार आहे. कारण आता डायरेक्ट गेटवे ऑफ इंडियापर्यंत मेट्रो धावणार आहे. मुंबईच्या अती गर्दी असलेल्या भायखळा, नागापाडा, भेंडीबाजार सारख्या एरियामधून ही मेट्रो ११ धावणार आहे. ’मेट्रो ३ आणि मेट्रो ११ मार्गिकेचा एंटरचेंज याच सीएसएमटी मेट्रो स्टेशन असणार आहे.

आणिक आगार ते गेटवे ऑफ इंडिया असा मेट्रो ११ चा मार्ग असेल. हा भुयारी मेट्रो प्रक्लप आहे. याचा प्रस्ताव केंद्राकडे सोपवण्यात आला आहे. आणिक आगार ते गेटवे ऑफ इंडिया भुयारी मेट्रो ११ मार्गिकेला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. आता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) या मार्गिकेचा प्रस्ताव तयार करण्यात आला. हा प्रस्ताव केंद्र सरकारने मंजूर केला आहे.

जवळ जवळ २४ हजार कोटींचा हा मेट्रो ११ प्रकल्प आहे. या मार्गिकेसाठी आणिक आगार आणि प्रतीक्षा नगर आगारातील १६ हेक्टर जागेवर कारशेड उभारण्याचा प्रस्ताव आहे. मेट्रो प्रकल्पाची सध्याची अपडेट म्हणजे चचठउङ ने मुंबई मेट्रो लाईन ११ (अनिक डेपो ते गेटवे ऑफ इंडिया) साठी अंतरिम सल्लागार नेमण्यासाठी निविदा आमंत्रित केल्या आहेत. आणिक डेपो, वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या १६ किमीच्या संपूर्ण भूमिगत मुंबई मेट्रो लाईन ११ ला महाराष्ट्र सरकारने यापूर्वीच मान्यता दिली आहे. सार्वजनिक गुंतवणूक मंडळ आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी हा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

दरम्यान मेट्रो ११ मार्गावर असलेली स्थानके पुढील प्रमाणे असतील.

- आणिक नगर बस डेपो
- वडाळा आगार
- CGS कॉलनी
- गणेश नगर
- बीपीटी हॉस्पिटल
- शिवडी
- गवत बंदर
- दारुखाना
- भायखळा
- नागपाडा जंक्शन
- भेंडी बाजार
- सीएसएमटी मेट्रो (लाइन–३/एक्का लाइनसह अदलाबदल)
- हॉर्निमन सर्कल

**– गेटवे ऑफ इंडिया**
**(श्यामा प्रसाद मुखर्जी चौक)**

# प्रवासी गुदमरले, श्वास थांबले... २६ प्रवाशांच्या मृत्यूचं कारण अखेर समोर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, जयपूर :** राजस्थानच्या जैसलमेरमध्ये एका बसला आग लागून २६ प्रवाशांचा मृत्यू झाला. या अग्निकांडानं बसमधील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. बसमध्ये असलेल्या फटाक्यांमुळे आग लागल्याची शक्यता सुरुवातीला वर्तवली जात होती. पण जोधपूर आणि जयपूरच्या फॉरेन्सिक सायन्स लॅबच्या संयुक्त तपासातून अग्निकांडामागील खरं कारण समोर आलं आहे.



जैसलमेरमधील थैयात गावाजवळ खासगी बसला भीषण आग लागली. १४ ऑक्टोबरला ही घटना घडली. जोधपूरला निघालेल्या एसी बसनं अचानक पेट घेतला. जैसलमेरहून निघताच अवघ्या १० मिनिटांत हा प्रकार घडला. या आगीचं कारण तपासातून स्पष्ट झालं आहे. बसच्या छतावर असलेल्या एसी युनिटमध्ये लागली होती. या युनिटचं वायरिंग इंजिनला थेट जोडलेलं होतं.

एका अधिकाऱ्यानं दिलेल्या म ागणीनुसार, वायरिंगमधून निघालेल्या ठिणगीनं धूर आणि कार्बन म ोनोऑक्साईड पसरला. त्यामुळे अनेक प्रवाशांचे श्वास थांबले. काहींनी खिडक्या फोडल्या आणि पळण्याचा प्रयत्न केला. खिडक्या फोडताच ऑक्सिजनमुळे आग अधिक भडकली. बसचे टायर, इंधन टाकी आणि खालील भाग सुरक्षित राहिला. यावरुन आग बसच्या वरील भागातून फोफावली, ही बाब तपासातून स्पष्ट झाली. सामानात सापडलेले फटाके पाण्यात भिजलेले आढळून आले. त्यामुळे त्यांचा संबंध आगीशी नव्हता हेदेखील स्पष्ट झालं.

जैसलमेरचे पोलीस अधीक्षक अभिषेक शिवहरे यांनी बस अग्निकांडाबद्दल सविस्तर माहिती दिली. सुरक्षा नियमांचं उल्लंघन झाल्यानं हा अपघात घडल्याचं त्यांनी सांगितलं. बस मालक, चालक आणि बसची बॉडी तयार करणाऱ्याला अटक करण्यात आली आहे. या बसमध्ये एसी वेगळा लावण्यात आला होता. वाहतूक पोलिसांकडे बसची नोंद एसी वाहन म्हणून नव्हती. बसमधून बाहेर निघण्यासाठी केवळ एकच दरवाजा होता. शॉर्ट सर्किट झाल्यानं तो लॉक झाला आणि अनेकांचा जळून कोळसा झाला.

बस दुर्घटनांची मालिका गेल्या काही दिवसांपासून सुरुच आहे. आज आंध्र प्रदेशच्या कुरनूल जिल्ह्यातील चिन्नातेकूर जवळ एका खासगी बसला आग लागली. एका दुचाकीला धडक दिल्यानंतर बसनं पेट घेतला. या आगीत २० जणांचा मृत्यू झाला. बसम ध्ये एकूण ४० प्रवासी होते. अनेकांचे मृतदेह पूर्णपणे जळाले असल्यानं त्यांची ओळख पटवण्यात अडचणी येत आहेत.

# महिला डॉक्टर मृत्यू प्रकरण; दिवाळीत घरी जाण्याआधीच आयुष्य संपवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, बीड :** सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या डॉक्टर तरूणीने भाऊबीजेच्या दिवशी फलटणमधील एका हॉटेलच्या बंद खोलीत रात्री आत्महत्या केली. तर या प्रकरणी महिलेच्या काकांनी आणि आतेभावाने गंभीर आरोप केले आहेत.



काकांच्या आरोपानुसार, पुतणीवर शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव आणला जात होता, ज्यामुळे ती मानसिक तणावाखाली होती. डॉक्टरने आपल्या वरिष्ठांना आणि नातेवाईकांना वारंवार सांगितलं होतं की, ’तणावामुळे माझे आयुष्य संपवावे लागेल,’ असं त्यांनी म्हटलं आहे.

**सुट्टी घेऊन ती मूळ गावी जाणार होती**

मयत डॉक्टर तरूणी ही दोन वर्षांपासून मेडिकल ऑफिसर म्हणून काम करत होती, मयत डॉक्टर तरूणी मूळची बीड जिल्ह्यातली आहे. दहावीपर्यंत शिक्षण बीड शहरातल्या शाळेत घेतलं. मृत डॉक्टर तरूणीला चार सख्खी भावंडे आहेत. आई वडील शेतकरी असून त्यांची परिस्थिती बेताची, तरी तिने चिकाटीने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलं. नातेवाईक उच्चशिक्षित असल्यानं तिनं शिक्षणाचं महत्व जाणलं. महाबळेश्वरमध्ये तिला पहिली पोस्टिंग मि ळाली होती, ६ महिने कंत्राटी पद्धतीने काम केलं, दीड वर्षांपूर्वी फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाली होती. पुढच्या आठवड्यात सुट्टी घेऊन ती मूळ गावी जाणार होती. दरम्यान, ही डॉक्टर तरूणी अविवाहित होती.

**पोस्टमार्टमची ड्युटी लागते आणि...**

मृत तरुणीनं घरी न सांगता हे टोकाचं पाऊल उचललं आहे. ज्यांच्याकडून त्रास झाला त्यांची नावं तिने हातावर लिहिलेली आहेत. ’आमची फक्त एवढीच अपेक्षा आहे की, आमच्या बहिणीला न्याय मिळावा. तिने याबाबत जास्त कोणाला सांगितलं नव्हतं, तिची एक दुसरी बहीण मेडिकल ऑफिसर आहे. तिला तिने राजकीय दबाव आणि पोलिसांचाही दबाव असल्याचा सांगितला होता. पोस्टमार्टमची ड्युटी लागते आणि त्यावेळी त्यांच्या म्हणण्यानुसार रिपोर्ट द्यावे लागतात, दबाव येतो ते तिने सांगितलं होतं.

दोन महिन्यापूर्वी तिने या संबंधीच्या पाठपुरावा करण्यासाठी पोलीस स्टेशनला पत्र लिहिलं होतं, त्यामध्ये तिने स्पष्ट उल्लेख केला होता. खासदारांच्या दोन पीएने फोन लावले होते, त्याचबरोबर पोलीस अधीक्षक याच्यावर आरोप केलेले आहेत, त्याचबरोबर कोणीतरी महाडिक म्हणून आहेत त्यांची नावं तिने त्या पत्रामध्ये लिहिलेले आहेत, गुन्हा दाखल करण्यासाठी तिने अर्ज दिला होता, पण गुन्हा दाखल करून घेण्यात आलेला नव्हता’, असंही भावाने सांगितलं आहे.

# लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच शेतकरी महिलेनं मृत्यूला कवटाळलं !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, बुलडाणा :** आधीच नापिकी, त्यातच कर्जाचा वाढता बोझा आणि अतिवृष्टीने उद्ध्वस्त केलेली पिके, यामुळे हताश झालेल्या बुलढाणा, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यांतील चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे गुरुवारी समोर आले. यात एका शेतकरी महिलेचाही समावेश आहे.



बुलढाणा जिल्ह्याच्या सिंदखेड राजा तालुक्यातील शिंदी येथील शिवाजी माणिकराव बुरकुल (६५) यांनी २१ ऑक्टोबरला विषारी औषध प्राशन केले. बराच वेळ होऊनही घरी न परतल्याने मुलांनी शेतात जावून पाहिले असता ही घटना निदर्शनास आली. बुलढाणा येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना २२ ऑक्टोबरला दुपारी त्यांचा मृत्यू झाला. बुरकुल यांच्यावर एका खासगी पतसंस्थेचे तीन लाखांचे कर्ज होते. कर्ज वसुलीसाठी नोटीस बजावण्यात आली होती. सततची नापिकी, वाढते कर्ज आणि अतिवृष्टी अशा तिहेरी पेचात सापडल्याने कर्ज कसे भरणार, या विवंचनेतच बुरकुल यांनी मृत्यूला कवटाळले. शेतकरी महिलेने घेतला गळफास

बँकेचे कर्ज काढून खरिपात सोयाबीनची लागवड केली. पीक आल्यानंतर कर्ज फेडू या आशेवर असतानाच अतिवृष्टीने घात केला. आता कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत असलेल्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील जावरा म ोळवण येथील माला महादेव मेश्राम (५२) या शेतकरी महिलेने आत्महत्या केली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी आठ वाजता ही घटना घडली.

पाच दिवसांत पाच घटना

यवतमाळ जिल्ह्याच्या केळापूर तालुक्यातील सुसुरी येथील रवी मोतिराम गेडाम (४०) यांनी गुरुवारी घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. मागील पाच दिवसांतील जिल्ह्यातील ही पाचवी शेतकरी आत्महत्या आहे. रवी यांची पत्नी मुलांना घेऊन भाऊबीजेसाठी माहेरी गेली होती. लहान भाऊ भीमरावला दाराची कडी आतमधून लावलेली दिसल्याने त्यांनी आवाज दिला. प्रतिसाद न मिळाल्याने शेजारच्या मदतीने त्यांनी दार तोडले. रवी घरात गळफास लावल्याचे दिसून आले. अमरावती जिल्ह्याच्या मोर्शी तालुक्यातील निंभी येथे एका शेतकऱ्याने मंगळवारी; दिवाळीच्या दिवशी विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. राहुल यशवंत छापाने, असे त्यांचे नाव आहे. त्यांच्याकडे सहा एकर शेत आहे. खरीपात त्यांनी सोयाबीनची लागवड केली. अतिवृष्टीमुळे यातून लागवड खर्चही निघणे कठीण झाले. कर्ज कसे फेडणार या विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली.

## पनवेलमध्ये एकाच कुटुंबातील ५ जणांचा स्वतःला संपवण्याचा प्रयत्न

**दि.२४, पनवेल :** पनवेलमधून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. ज्यात कुटुंबाने सामुहिक आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. ही घटना पनवेल तालुक्यामधील जावळे गावामध्ये घडली. एका खोलीत राहणाऱ्या कुटूंबाने सामुहिक आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या घटनेमुळे परिसरात खळबळ म ाजली आहे. या पाचजणांपैकी एक जण मृतावस्थेत सापडला असून इतरांवर नवी मुंबईतील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेसंबंधी उलवा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करित आहेत.मिळालेल्या माहितीनुसार जावळे गावात भाड्याच्या घरात राहणाऱ्या एकाच कुटुंबातील पाच जण बेशुद्ध अवस्थेत सापडले. या पाचही जणांनी चहामधून विषारी द्रव्य पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. या घटनेतील एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. मूळचे नेपाळी असणारे हे एकाच कुटूंबातील सदस्य जावळे गावात अनेक दिवसांपासून राहत होते. मागील दोन ते तीन दिवसापासून त्यांच्या घराचा दरवाजा उघडण्यात आला नव्हता. त्यामुळे शेजारच्यांना काहीतरी घडल्याचा संशय आला. त्यांनी यासंबंधींची माहिती अग्निशमन दल आणि पोलिसांना माहिती दिली. सुरक्षा यंत्रणा तेथे पाचारण झाली. सूरक्षा यंत्रणेच्या जवानांनी घराचा दरवाजा उघडला. त्यावेळी त्यांना कुटुंबातील पाचही जण बेशुद्ध अवस्थेत आढळले होते.

## संपादकीय

### शहरे गुदमरली ; श्वास कोंडला

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरात रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. मंगळावर ते बुधवार या तिन्ही दिवशी देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेल्या शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली. न्यायालयाने फटाके उडवण्यास परवानगी दिली म त्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करून मनसोक्त फटाकेबाजी केली वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याच्या व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित श्रेणीत गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे समोर आले आहे. मुंबई पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण वाढल्याचे पाहायला मिळाले. या प्रदूषणाला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेली शहरे अशी ओळख असलेल्या शहरांचीही प्रदूषित शहरांत गणना होऊ लागली. अर्थात मुंबई, नवी मुंबई, ठाणे हीच शहरे नाही तर पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले. विशेष म्हणजे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा मात्र समाधानकारक या श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीतील हवा अतिप्रदूषित या श्रेणीतून समाधानकारक श्रेणीत गणली गेली याचे कारण म्हणजे यावर्षी दिल्लीत फटाके वाजवण्यास बंदी घालण्यात आली होती आणि या बंदीचे कसोशीने पालन करण्यात आले होते या उलट आपल्या राज्यात मात्र उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याचाच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहा ना सोमवारी संध्याकाळी पुण्याच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला. दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या. अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षांपासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतरवेळीही फटाके वाजवले जातात दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच कदाचीत त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.

# बीस साल बाद.. पुन्हा ठाकरे बंधू एकत्र..?

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र येऊन युती करतील आणि लवकरच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवतील, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. पण प्रत्यक्षात तसे होणार की आणखी काय होणार याची अद्याप तरी काही खात्री देता येत नाही, कारण राजकीय परिस्थिती सतत बदलत असते. राजकारणाइतका अस्थिर प्रांत अन्य कुठलाच नाही, असे म्हणावे लागते. त्यामुळे राजकारणात कुणीच कुणाचा कायमस्वरूपी मित्रही नसतो आणि शत्रूही नसतो, असाच अनुभव राजकीय नेत्यांनाही येत असतो. याच अस्थिरतेमुळे अनुभवी राजकीय विश्लेषकांचे अंदाजही चुकतात. राजकारणात आणि अगदी जीवनातही काही अदृश्य घटक असतात, ते परिस्थिती अचानक बदलवतात. त्यामुळे अनेकांचे अंदाज चुकतात. ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, यासाठी उद्धव ठाकरे यांच्या बाजूने जास्त जोर लावला जाताना दिसत आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत हे त्यासाठी अविरत प्रयत्न करत आहेत.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना वेगळे होऊन आता २० वर्षे झाली आहेत. अलीकडच्या काळात गणपतीनंतर या दोन्ही भावांच्या कौटुंबिक गाठीभेटी वाढल्या आहेत. ५ जुलैच्या वरळी डोम येथील जाहीर सभेमध्येही आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. पण राज ठाकरे या एकत्रिकरणाबाबत त्या सभेत फारसे बोलले नाहीत. इतकेच नव्हे तर त्यानंतरही त्यांच्या काही गाठीभेटी झाल्या. नुकतेच दिवाळीच्या निमित्ताने शिवाजी पार्कवर दोन्ही बंधू आपल्या कुटुंबियांसोबत दीपोत्सवात सहभागी झाले. त्यामुळे हे दोन्ही बंधू पुढील काळात एकत्र



येतील, अशी आशा त्यांच्या चाहत्यांना वाटत आहे. उद्धव ठाकरे एकत्रिकरणाबद्दल आशावादी आहेत, पण राज ठाकरे यांच्याकडून मात्र तसे कुठलेच वक्तव्य केले जाताना दिसत नाही, हे बारकाईने पाहिल्यावर लक्षात येईल.

राज यांनी आपला सस्पेन्स कायम राखलेला आहे. सध्या राज ठाकरे मतदार याद्यांच्या मुद्द्यांवर आक्रमक झाले आहेत. जोपर्यंत मतदार याद्यांमध्ये सुधारणा होत नाहीत, तोपर्यंत कशा निवडणुका घेतात, हेच पाहतो असे राज ठाकरे यांनी बजावले आहे. निवडणूक मतदान यंत्र आणि निवडणूक याद्या यावरून सध्या देशभरातच मोठा वादविवाद सुरू आहे. त्याविषयी संशय व्यक्त करण्यात येत आहे. टाळी ही दोन हाताने वाजत असते, त्यामुळे उद्धव ठाकरे आणि त्यांचे समर्थक राज यांना टाळी देण्यासाठी कितीही उत्सुक असले तरी राज यांच्याकडून हात पुढे केला जाणे महत्त्वाचे आहे. काही उत्सवी कार्यक्रमांना एकत्र येणे आणि व्यावहारिक पातळीवर सांगड घालणे यात फरक असतो. राजकीय पातळीवर एकत्र येण्यासाठी दोन्ही बंधूंना राजकीय पातळीवर युती करावी लागेल.



**कव्हर स्टोरी**

**- शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर..**

जागांचे वाटप करावे लागेल. त्यात कार्यकर्त्यांचे समाधान व्हावे लागेल, अशा अनेक गोष्टी दडलेल्या आहेत. सध्या उद्धव आणि राज ठाकरे कुठल्या प्रसंगी एकत्र आले की, प्रसारमाध्यमांवर सनसनाटी बातमी बनते. पण त्यातील वास्तवतेचा शोध घेण्याची गरज आहे.

राज ठाकरे आपली घुसमट होते हे कारण देऊन मूळ शिवसेनेतून बाहेर पडले होते, पण ही घुसमट उद्धव ठाकरे यांच्यामुळे होत होती हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. कारण बाळासाहेबांनंतर राज ठाकरे असेच समीकरण सगळ्यांना वाटत होते, पण राज यांच्या जागी उद्धव यांना आणण्यात आले, त्यामुळे राज दुखावले गेले. ते पक्षातून बाहेर पडले. त्यानंतर त्यांनी शिवसेनेला पर्यायी असा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा वेगळा पक्ष स्थापना केला. मी महाराष्ट्राच्या नवनिर्माणासाठी स्वतःला वाहून घेत आहे, असे राज ठाकरे यांनी शिवाजी पार्कवरील पक्षाच्या पहिल्या सभेत जाहीर केले. खरे तर शिवसेनेची स्थापना ही महाराष्ट्र आणि मराठी माणूस यांच्या न्याय हक्कांसाठी झालेली होती. तर मग राज ठाकरे यांना तेच कार्य करणाऱ्या वेगळ्या पक्षाची स्थापना करण्याची काय गरज होती, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. याचा अर्थ राज यांच्या महत्त्वाकांक्षेला मूळ शिवसेनेत वाव मिळत नव्हता, त्यांना आडकाठी आणण्यात येत होती, त्यामुळेच त्यांची घुसमट होत होती, त्यामुळेच ते बाहेर पडले. प्रत्येकाला आपण पुढे जावे असे वाटत असते. त्यामुळे स्पर्धा निर्माण होत असते. त्यातूनच संघर्ष होत असतो. भारताचा इतिहास पाहिला तर असा संघर्ष होणारे उद्धव आणि राज ठाकरे हे काही पहिले बंधू नाहीत. आता मुद्दा हा आहे की, सत्तासंघर्षाम ुळे वेगळे झालेले ठाकरे बंधू आता एकत्र येऊन महाराष्ट्र आणि मराठी माणसांच्या हिताचे नेमके काय करणार आहेत. ते त्या दोन्ही बंधूंनी स्पष्ट करण्याची गरज आहे. कारण आता राजकारणात भ्रष्टाचाराचे आरोप ही काही आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट राहिलेली नाही. कारण सब घोडे बारा टक्के, अशी स्थिती आहे. टक्केवारी ही सर्वत्र आहे, हे जनतेला माहीत आहे. त्यामुळे भावनिक मुद्द्यांच्या पलीकडे जाऊन मराठी लोकांना पटतील, असे मुद्दे घेऊन ठाकरे बंधूंना पुढे यावे लागेल, तरच त्यांच्या एकत्रिकरणावर मराठी लोकांचा विश्वास बसेल.

# उत्सुकता ‘द ताज स्टोरी’ चित्रपटाची !

ताजमहाल हा ‘तेजोमहाल’, म्हणजे भगवान शिवाचे मंदिर असल्याचे वास्तव उघड करणारा ‘द ताज स्टोरी’ हा चित्रपट ३१ ऑक्टोबरला देशभरात प्रदर्शित होत आहे. युट्युबसह अन्य सामाजिक माध्यमांवर व्हायरल झालेला चित्रपटाचा ट्रेलर सध्या जोरदार चर्चेत आहे. जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेला ताजमहाल शाहजहान या मोगल सम्राटाने पत्नी मुमताज हिच्या स्मरणार्थ बांधल्याचे आजतागायत इतिहासाच्या पुस्तकांतून शालेय विद्यार्थ्यांवर बिंबवण्यात आले. मात्र यामागील सत्य वेगळेच असून ते या चित्रपटाच्या माध्यम ातून मांडण्याचा धाडसी प्रयत्न या चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. त्यामुळे लोकांमध्ये त्याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

जेष्ठ इतिहास संशोधक पुरुषोत्तम ओक यांनी ताजमहाल विषयी सखोल संशोधन करून ‘ताजमहाल नव्हे तेजोमहाल’, हे पुस्तक लिहिले; मात्र एकगठ्ठा मतांसाठी तत्कालीन सरकारच्या काळात हे सत्य दडपण्यात आले. ते सत्य ‘द ताज स्टोरी’ या चित्रपटातून मांडण्यात आले आहे. सुरेश झा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून तुषार अमरीश गोएल यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली आहे. या चित्रपटाचे वैशिष्ट्यपूर्ण कथानक आणि सामाजिक म ाध्यमांवरील प्रतिक्रिया पहाता देशपातळीवर या चित्रपटाविषयी उत्सुकता दिसून येत आहे. चित्रपटामध्ये ‘ताजमहाल’ची माहिती देण्यासाठी ‘गाईड’ म्हणून काम करणार्या परेश रावल यांना ताजमहालच्या वास्तूवर स्वस्तिक, श्रीफळ, त्रिशूळ, ॐ आदी असंख्य प्रतिके आढळून येतात. त्यानंतर त्यांनी ताजमहालच्या वास्तूचा सखोल अभ्यास केल्यावर ताजमहालमधील बंद करण्यात आलेल्या २२ खोल्या, ताजमहालच्या तळघरात सापडलेली हिंदूंची प्रतिके आढळून येतात. त्या वेळी ताजमहाल हे भगवान शिवाचे मंदिर असल्याचे वास्तव त्यांना आढळून येते. हे सत्य शोधण्यासाठी पत्करलेली जोखीम; हे सत्य उघड होऊ नये, यासाठी एका सम ाजाकडून त्यांना झालेला प्रचंड विरोध आणि सत्यासाठी त्यांनी दिलेला न्यायालयीन लढा अशी चित्तथरारक अन् संघर्षाची कथा या चित्रपटात साकारण्यात आली आहे. ताजम हालच्या संशोधनात सापडलेली हिंदू धर्मातील सात्विक प्रतीके आणि त्याठिकाणी दडवण्यात आलेले पुरावे याविषयी याआधीही अनेक पोस्ट सामाजिक माध्यमांतून पाहण्यात आल्या होत्या. मात्र चित्रपटाच्या माध्यमातून त्याबाबत रीतसर माहिती मिळणार असल्याने हा चित्रपट समस्त भारतीयांनी चित्रपट गृहांत जाऊन पाहायला हवा. ताजमहालसारख्या देशभरात अनेक वास्तू आहेत ज्या यवनी आक्रमकांनी पाडून किंवा दडवून त्याठिकाणी आपल्या पंथाच्या वास्तू उभ्या केल्या आहेत. अशा अनेक वास्तू पुन्हा हिंदूंच्या ताब्यात देण्यात याव्यात यासाठी न्यायालयात संघर्ष सुरु आहे. अनेक वर्षांच्या संघर्षांनंतर श्रीरामजन्मभूमीत बाबरी मशिदीच्या ठिकाणी सकल हिंदूंचे श्रद्धास्थान असलेले भव्यदिव्य राममंदिर उभे राहिले. ‘द ताज स्टोरी’ च्या माध्यमातून ताजमहालमागील दडलेले सत्य जगासमोर येणार आहे. मथुरा, काशी, भोजशाळा, कुतूबमिनार, संभल येथील जमा मशीद अशी देशभरात शेकडो ठिकाणी आहेत ज्या ठिकाणी मंदिरे पाडून आक्रमकांनी आपल्या वस्तू उभारल्या असल्याचे पुरावे सापडले आहेत. भविष्यात या सर्वांवर सखोल संशोधन होऊन सत्य काय ते जगासमोर येईलच.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## ट्रोल...

**जीभ घसरे जराही**
**जाऊ दे कधी तोल**
**ते ट्रोलकरीटपलेले**
**कराय लागले ट्रोल**

**फॉरवर्डस् तातडीने**
**नसतो मुळी कंट्रोल**
**सुसाटसुटलेआरोप**
**ना देता कुठेचं टोल**

**अस्पष्ट स्पष्टीकरण**
**दे उत्तरे गोलमटोल**
**झटकून टाका सारे**
**अंगलटी येता झोल**

**वरुन येतो दट्ट्या**
**सावध जरासे बोल**
**कॅमे-या समोर मात्र**
**सुनावले खडे बोल**

**चारित्र्य हनन होता**
**मोजावेलागते मोल**
**होवून जाई क्षणार्धा**
**कारकीर्द मातीमोल**

**अंतस्थशत्रु भयावह**
**तेचं करी पोलखोल**
**पाताळयंत्री सरासवे**
**पाताळी धाडा खोल**

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# कराडच्या मंगल आजीचा प्रेरणादायी जीवनप्रवास

**कराडच्या मंगल आजीचा प्रेरणादायी जीवनप्रवास... वयाच्या ६५ व्या वर्षी देखील चालवतात रिक्षा....**



● कराडमधल्या मंगल आबा आवळे म ार्चपासून रिक्षा चालवत आहेत. त्यांना गेल्या सात महिन्यांत आलेले अनुभव मजेशीर आहेत. त्यांनी पहिल्यांदाच वाहन चालवलं तेही रिक्षा. वयाच्या ६५ व्या वर्षी नवं शिकण्याची त्यांची इच्छा पाहून अनेकजण अवाक होत आहेत.

कराडच्या आजींचा विषयच वेगळा आहे. वयाच्या ६४ व्या वर्षी सातारा जिल्ह्यातील कराडम धल्या मंगल आबा आवळे यांनी स्टीअरिंग हातात घेतलं आणि रिक्षा चालवायला सुरुवात केली. आयुष्यभर शेतमजुरी करणाऱ्या मंगल आजींनी या वर्षी मार्च महिन्यापासून रिक्षा चालवायला घेतली. घरात पडून असलेल्या रिक्षेतून आता त्या रोज प्रवासी घेऊन कराड शहरात फिरतात. आणि त्यांच्यासोबत फिरते एक प्रेरणादायी आणि लई भारी कहाणी.

मंगल आजींनी याआधी कधीच कोणतंही वाहन चालवलं नव्हतं. नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांनी शेतम जुरी करून चार मुलांना शिक्षण दिलं. मुलगा एसटी ड्रायव्हर आहे. त्यानं रिक्षा घेतल्यावर आजींनी त्याला म्हटलं, मला शिकव, थोडाफार हातभार लावीन. सुरुवातीला त्या ब्रेकला ’हॅण्डल’ आणि हॅण्डलला ’ब्रेक’ म्हणायच्या, त्या हसत हसत सांगतात. पण केवळ काही दिवसांत त्यांनी आत्मविश्वासानं रिक्षा शिकून घेतली. त्यांचं धाडस पाहून आरटीओनं त्यांना लायसन्स मिळवून दिलं.

आज मंगल आजी रिक्षा स्टॅण्डवर उभ्या असतात आणि ग्राहकांना आवाज देतात, तेव्हा अनेकजण थक्क होतात. ’ग्राहक विचारतात की ड्रायव्हर कुठे आहे? मीच म्हणते, मीच ड्रायव्हर आहे!’ हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर कमालीचा आत्मविश्वास असतो. कॉलेजच्या मुली तर आजीची रिक्षा आली म्हणत त्यांच्याच गाडीत बसतात.

आजींचा तरुणांना सल्ला एकच धाडस वाढल्याशिवाय काही नाही. मागं पडू नका. काम धंदा नाही म्हणून घरी रडत बसू नका. कुठलंही काम करा.

**- संकलन : संजय पंडित**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## इकोस्ट्रक्टच्या अवजड वाहनांनी अडवला सार्वजनिक रस्ता
### ओव्हरलोड वाहनांसह कंपनीवर कारवाईची मागणी




**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** नवी मुंबईतील रबाळे एम आयडीसीची मूळ परवानगी असलेल्या व सध्या शहापूर तालुक्यातील सावरोली(सो) गावाशेजारी सुरु असलेल्या इकोस्ट्रक्ट इंजिनिअरिंग प्रा.लि. या फेब्रिकेशन कंपनीच्या बेकायदेशीर अवजड वाहनांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाचा नांदगाव ते सावरोली (सो) हा रहदारीचा रस्ता अडवण्याचे प्रकार वारंवार होत आहेत. दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी नांदगाव शेजारी या कंपनीचे ओव्हरलोड असलेले अवजड वाहन अडकून पडल्याने कित्येक तास नागरिकांना त्रास सहन करावा लागला. दरम्यान सावरोली (सो) रस्त्यावर चालणाऱ्या या विनापरवानगी ओव्हरलोड वाहनांवर व नियमांची पायमल्ली करणाऱ्या इकोस्ट्रक्ट कंपनीवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी. अशी मागणी किन्हवली पोलिसांकडे करण्यात आली आहे.

सावरोली (सो) ग्रामपंचायत क्षेत्रात सर्वे क्र.२४१/१ मध्ये सागवान झाडांची बेसुमार कत्तल व मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन करुन मनोहर पठाडे यांनी इकोस्ट्रक्ट इंजिनिअरिंग कंपनी सुरु केली आहे. अनधिकृत उत्खनन केल्याबद्दल शहापूर तहसीलदार यांनी सदर कंपनीला लाखो रुपयांचा दंडही ठोठावला होता.मात्र तरीही अर्धवट परवानग्या घेवून सदर कंपनी नवी मुंबईतील कंपनीच्या ऑर्डर सावरोली येथे पूर्ण करत आहे.कामगारांची सुरक्षितता, त्यांचा विमा यांचा विचार करता अनेक बाबी संशयास्पद असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात असून सदर कंपनी नेहमीच विनापरवानगी अवजड वाहनांतून ओव्हरलोड माल नांदगाव -सावरोली(सो) या इतर जिल्हा मार्गावरुन कंपनीपर्यंत व तेथून मुंबईत वाहतूक करत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे अनेकदा हे अवजड वाहन नांदगाव शेजारील चढावावर अडकून वाहतुकीला अडथळा निर्माण करत असते. रस्त्याच्या बाजूला असलेल्या घरांना व या मार्गावरुन वाहने चालवणाऱ्या नागरिकांना, शालेय विद्यार्थ्यांना या वाहनांमुळे धोका निर्माण झाला आहे. रस्त्यात मोठमोठे खड्डे पडून एका ठिकाणी मोरी ही फुटली आहे. याची दखल घेवून सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर धानके व नागरिकांनी किन्हवली पोलिसांकडे लेखी तक्रार करून इकोस्ट्रक्ट कंपनी व वाहनांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. दरम्यान गुरुवारी अडकलेल्या अवजड वाहनातून सुमारे ३७ हजार टन लोखंडी प्लेटची वाहतूक केली जात असल्याचे समजते. किन्हवलीचे सपोनि नितीन खैरनार व सार्वजनिक बांधकाम विभाग शहापूरचे शाखा अभियंता ठाकूर यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले असले तरी कारवाई करण्यात दिरंगाई होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

## येडेश्वरी परिवाराच्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाला अलोट गर्दी



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२३, केज :** येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (सा.), ता.केज येथे येडेश्वरी परिवाराच्या वतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्नेहमिलन व फराळाचा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी खासदार बरजंग सोनवणे यांनी सर्वांचे स्वागत करून जिल्हाभरातून एकत्र आलेल्या नागरिकांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. खा.बजरंग सोनवणे यांच्या वतीने येडेश्वरी साखर कारखाना, आनंदगाव येथे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्नेहमिलन व फराळाचा कार्यक्रम आयोजीत केला होता. या आनंद सोहळ्यात बीड जिल्ह्यातील मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आपुलकी, आनंद, एकता आणि सहभावनेचा हा सोहळा येडेश्वरी परिवाराच्या स्नेहबंधनाला आणखी बळकट करणारा ठरला. कार्यक्रमादरम्यान परस्पर संवाद, शुभेच्छा विनिमय आणि सहकाऱ्यांच्या मैत्रीपूर्ण गप्पांमुळे वातावरण स्नेहपूर्ण आणि उत्साही बनले. या प्रसंगी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविणाऱ्या सर्वांचे आभार खा.सोनवणे यांनी मानले. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित ऊस उत्पादकांशीही संवाद साधत नवीन पध्दतीने शेती करण्यासाठी सज्ज व्हा, एआय तंत्रज्ञात विकसीत होत आहे. यानुसार आता शेती करावी लागेल. तेव्हा, आपल्याला शेतीतून अधिक उत्पन्न घेणे शक्य होईल. नव्या बदलासाठी सर्वांनी पुढे येणे आवश्यक आहे. उत्पादन वाढविण्यासाठी लागेल ती करायची तयारी ठेवा, कष्ट, मेहनतीसोबत योग्य नियोजन देखील आवश्यक आहे. यासाठी कारखान्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन देखील करण्यात येईल, असेही यावेळी खा.सोनवणे म्हणाले. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

## परतीच्या पावसामुळे शहापुर तालुक्यातील शेतकरी संकटात

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील सर्वच भागात परतीच्या पावसामुळे कापून ठेवलेल्या भातात पाणीच पाणी झाल्यामुळे बळीराजाच्या हातातोंडासी आलेला घास हिरावून जाण्याची शक्यता निर्माण झाली असून यामुळे शेतकरी पूर्णपणे संकटात सापडला आहे. या भिजलेल्या भातामुळे पेंढा ही वाया जाणार असल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दसरा झाल्यानंतर भात कापणीला सुरुवात केली जाते. परंतु काही दिवस पावसाची परिस्थिती पाहून १५ तारखेनंतर पडलेल्या लख्ख प्रकाशामुळे शेतकऱ्यांनी भात कापणीला सुरवात केली. ४ - ५ दिवसात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भात कापणी करून ठेवली. परंतु हवामानाच्या दिलेल्या अंदाजानुसार ऐन दिवाळीत पाऊस पडणार असल्याचे भाकीत तंतोतंत खरे ठरले असल्याचे दिसून आले.शहापूर तालुक्यात आज झालेल्या वादळवारा व तुफान पावसामुळे कापून ठेवलेल्या भातात पाणीच पाणी झाले असून यामुळे भाताचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने लवकरच लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## दीपावलीनिमित्त मुलांनी बनवले आकर्षक किल्ले

**अक्षराज : अक्षय गिरा**



**शहापूर (ठाणे) :** शहापूर शहरासह ग्रामीण भागात दीपावली सणानिमित्त मुलांनी विविध ठिकाणी आकर्षक व देखणे किल्ले उभारले आहेत. या किल्ल्यांमध्ये शिवकालीन किल्ल्यांची झलक दिसून येत असून, त्यावर सजावट, तोफा, दरवाजे आणि सैनिकांच्या मूर्तींची सजावट ही करण्यात आली आहे. मुलांनी आपल्या कल्पकतेचा आणि परिश्रमाचा सुंदर संगम घडवून ऐतिहासिक वारसा जपण्याचा प्रयत्न केला आहे. नागरिकही मोठ्या उत्साहाने या किल्ल्यांना भेट देत आहेत व मुलांच्या कलागुणांचे कौतुक करत आहेत. दीपावलीचा आनंद या छोट्या कलाकारांच्या किल्ल्यांमुळे अधिक खुलून आला आहे.

## 'आपला पैसा - आपला अधिकार' मोहिमेचा लाभ घ्यावा - प्रभारी जिल्हाधिकारी डॉ.व्यवहारे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४ चंद्रपूर :** भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागांतर्गत सुरू असलेल्या आपला पैसा - आपला अधिकार या विशेष मोहिमेचा शुभारंभ चंद्रपूर जिल्ह्यात प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात करण्यात आला. या मोहिमेचा उद्देश आर्थिक क्षेत्रातील दावा न केलेल्या ठेवी व मालम त्तेचे कार्यक्षम व जलद वितरण सुनिश्चित करणे हा असून, १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत ही मोहिम राबविण्यात येणार आहे.

या प्रसंगी भारतीय रिझर्व्ह बँकेचे सहायक व्यवस्थापक महेश थुल, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष पोरकुटे, बँक ऑफ इंडियाचे मुख्य व्यवस्थापक गौरव विश्वकर्मा, स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक शेखर बारापात्रे, बँक ऑफ महाराष्ट्राचे मुख्य व्यवस्थापक प्रशांत सांगवी, तसेच जिल्ह्यातील सर्व बँका, वित्तीय संस्थांचे जिल्हास्तरीय समन्वयक, अधिकारी व दावेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभारी जिल्हाधिकारी डॉ.नितीन व्यवहारे म्हणाले की, ही मोहिम केंद्र सरकारची अतिशय लोकहिताची व जनसहभागातून राबविण्यात येणारी संकल्पना आहे. नागरिकांचे कोट्यवधी रुपये निष्क्रीय खात्यांत पडून आहेत. अनेक शासकीय संस्थांची खाती देखील या स्वरूपात आहेत. सर्व नागरिकांनी, संस्थांनी व वारसांनी आपल्या बँकांशी संपर्क साधून आपली दावा न केलेली रक्कम परत मिळवावी, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. ते पुढे म्हणाले की, गेल्या १० वर्षांपासून व्यवहार नसलेली बँक खाती निष्क्रीय होतात व अशा खात्यांतील रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार गोठविली जाते. या रक्कमा दावा न केल्यास बँकांकडे जमा राहतात. अशा परिस्थितीत आपला पैसा - आपला अधिकार मोहिमेअंतर्गत नागरिकांना त्यांचे हक्काचे पैसे मिळविण्यासाठी ही एक सुवर्णसंधी आहे.

डॉ. व्यवहारे यांनी यावेळी सर्व बँकांना ग्राहकांशी थेट संपर्क साधण्याचे व माहिती देण्याचे निर्देश दिले. तसेच, ग्राहकांनी आपले मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत ठेवावेत, जेणेकरून भविष्यात बँकांकडून संपर्क सुलभ होईल व निष्क्रीय खात्यांची संख्या कमी होईल, असेही त्यांनी नमूद केले. जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक आशिष पोरकुटे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्राहकाने दोन वर्षांपर्यंत कोणतेही व्यवहार न केल्यास खाते निष्क्रीय होते, आणि १० वर्षांपर्यंत व्यवहार न झाल्यास ते खाते 'दावा न केलेले' म्हणून वर्गीकृत केले जाते. त्यामुळे प्रत्येक खातेदाराने आपल्या सर्व खात्यांमध्ये वेळोवेळी व्यवहार करून ते सक्रिय ठेवणे आवश्यक आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील आकडेवारीनुसार, एकूण ३ लाख ७६ हजार २४२ निष्क्रीय खात्यांमध्ये सुमारे ८८ कोटी




रुपयांची रक्कम दावा न केलेल्या स्वरूपात पडून आहे. यात वैयक्तिक, संस्थात्मक तसेच शासकीय संस्थांची खाती समाविष्ट आहेत.

सदर मोहिमेअंतर्गत प्रत्येक बँक शाखेत विशेष बूथची स्थापना करण्यात आली असून, संबंधित दावेदारांनी अथवा त्यांच्या वारसांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बँकेशी संपर्क साधून आपली रक्कम परत मिळवावी, असे आवाहन सर्व बँक व्यवस्थापकांनी केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांच्या हस्ते काही पात्र दावेदारांना दावा मंजुरी पत्रांचे वाटप करून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. तर कार्यक्रमांचे संचालन जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी प्रतीक गोंडणे केले असून कार्यक्रमांचे आभार प्रदर्शन बँक ऑफ इंडियाचे मुख्य व्यवस्थापक गौरव विश्वकर्मा यांनी केले.

## 'माझा गाव माझा स्वाभिमान' केवळ पोकळ वल्गना
### धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय' अशी ॲडमिनची स्थिती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यनगर :** आज प्रत्येक गावागावांत विविध नावांनी व्हॉट्सॲप ग्रुप्स सुरू आहेत. काही गावांमध्ये हे ग्रुप्स विधायक कामे करत असले, तरी अनेक ठिकाणी व्हॉट्सॲपवर वैयक्तिक हेवेदावे आणि मत्सर याचेच ओंगळवाणे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात दिसत आहे. अनेक ग्रुप्स गावाच्या, देवाच्या नावावर, तसेच 'बालमित्र', 'तरुण मित्र', ' युवा प्रतिष्ठान', युवा मंच, 'गावकी' भावकी अशा विविध नावांनी चालू आहेत. यातील बहुतांश ग्रुप्सवर फक्त शुभ सकाळ, शुभ रात्री, वाढदिवसाच्या शुभेच्छा, भावपूर्ण श्रद्धांजली, विवाह, मुंज, बारसे यांसारख्या पोस्ट्सचा भडीमार असतो.गावातील एखाद्या ग्रुपवर सर्व जातीधर्मांचे सदस्य असले तरी, एकोप्याने राहण्याऐवजी परस्पर मतभेदच मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. एकूणच यामुळे 'माझा गाव माझा स्वाभिमान' ही केवळ पोकळ वल्गना ठरू लागली आहे.

'माझा गाव माझा स्वाभिमान' अशा पोकळ वल्गना देणारे काही सोशल समाजसेवक व्हॉट्सॲप ग्रुपवर केवळ मत प्रदर्शित करतात. परंतु गावातील विविध समस्यांविषयी त्यांची कायमच दातखिळी बसलेली असते. कारण गावातील लाईट, पाणी, आरोग्य, शिक्षण, बिबट्यांचा प्रश्न, अवैध व्यवसाय, अतिक्रमण अशा विविध समस्यांविषयी ग्रुपवर टाकणे म्हणजे गावाची बदनामी होणे असा जावईशोध त्यांनी लावलेला असतो. खरंतर अशा लोकांना गावाच्या स्वाभिमानापेक्षा स्वतःचा अहंकार कुरवाळण्यातच जास्त आनंद असतो. चुकून एखाद्या ग्रुपच्या सदस्याने गावातील समस्यांविषयी ग्रुपवर प्रश्न मांडला तर त्याला एकटे पाडून सर्व बाजूंनी खच्चीकरण केले जाते आणि गावच्या बदनामीला तो कसा कारणीभूत आहे,असे मत प्रदर्शित करून एकमेकांची मने खराब करण्याचे काम ते करतात. त्यामुळे कित्येकदा ग्रुप ॲडमिनची दमछाक होते आणि धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय अशी बिकट अवस्था होताना दिसते.

**चमको नेत्यांचे चेले वरचढ**

आज विविध गावांमध्ये आमदार, खासदार आल्यानंतर त्यांच्या पुढे पुढे करून, त्यांच्यासोबत फोटो काढून आम्ही कसे साहेबांच्या जवळचे आहोत, हे दाखवण्यासाठी गावातील नेत्यांचे चमको चेले प्रयत्नशील असतात. हेच चेले गावामध्ये दहशत पसरवण्याचा प्रयत्न करत असतात. उथळ पाण्याला खळखळाट फार अशी चमको चेल्यांची अवस्था असते. सर्वसामान्य नागरिक मात्र अशा वृत्तीच्या लोकांमुळे गावातील समस्या दिसत असतानाही मूग गिळून गप्प बसतात.

**ग्रामसभा ही मिनी विधानसभा, पण..**

प्रत्येक गावात ग्रामपंचायतीची ग्रामसभा असते,१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशीच्या ग्रामसभा सोडून इतर ग्रामसभांना नागरिकच काय तर ग्रामपंचायत सदस्यही दांडी मारतात. जर लोकांनी निवडून दिलेल्या ग्रामपंचायत सदस्याला गरामसभेचे महत्त्व नसेल तर नागरिकांकडून काय अपेक्षा करणार हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

**नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी संधी**

खरंतर ग्रामसभेत नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी संधी असते, परंतु अनेक नागरिक ग्रामसभेला जाणे टाळतात व सोशल मीडियावर आपली बाजू मांडतात. खरंतर ग्रामसभेने केलेला एखादा ठराव त्याला विधानसभेच्या ठरावाईतकेच महत्त्व असते. त्यामुळे गावातील चुकीच्या गोष्टींच्या विरोधात नागरिकांनी ग्रामसभेला उपस्थित राहून चुकीच्या गोष्टी बंद करण्याचा ठराव करण्याचा आग्रह करणे गरजेचे असते.

## राज्यातील ६ तायक्वांदो खेळाडूंची तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२४, सोलापूर :** तायक्वांदोच्या क्षेत्रात महाराष्ट्राने एक अभूतपूर्व इतिहास रचला आहे. राज्यातील ६ प्रतिभावान खेळाडूंची प्रतिष्ठेच्या तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. या स्पर्धा २३ ते २६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान बहरीन येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राच्या तायक्वांदो आणि क्रीडा समुदायासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे, कारण राज्याने प्रथमच अशी लक्षणीय कामगिरी नोंदवली आहे. राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठोर आणि स्पर्धात्मक निवड प्रक्रियेनंतर या युवा खेळाडूंनी भारतीय संघात आपले स्थान निश्चित केले आहे.

या निवड झालेल्या खेळाडूंमध्ये प्रिशा शेट्टी (सातारा), धनश्री पवार (पुणे), किसारा थानोजी साई रेड्डी (अहिल्यानगर), अक्षरा शानबाग (मुंबई), आर्यन जोशी (पुणे) आणि समर्थ गायकवाड (मुंबई उपनगर) यांचा समावेश आहे. या सर्व खेळाडूंनी महाराष्ट्राचा गौरव वाढवला आहे. विशेष म्हणजे, किसारा थानोजी साई रेड्डी ही कोरोगी (स्पर्धात्मक लढत) आणि पुमसे (प्रात्यक्षिक) अशा दोन्ही प्रकारांमध्ये स्पर्धा करणार आहे, जे तिचे अफाट कौशल्य आणि बहुमुखी प्रतिभा दर्शवते.गेल्या दोन महिन्यांपासून हे युवा खेळाडू लखनऊ, उत्तर प्रदेश येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) प्रशिक्षण केंद्रात कठोर आणि सुनियोजित प्रशिक्षण घेत आहेत. तज्ज्ञ राष्ट्रीय प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून त्यांनी जागतिक स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी शारीरिक आणि मानसिक तयारी केली आहे. त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे लक्ष ऑलिम्पिक स्तरावरील कामगिरी, फिटनेस आणि कौशल्य विकासावर केंद्रित आहे. या सर्व खेळाडूंचा प्रवास, निवास, भोजन आणि प्रशिक्षण



यासह सर्व खर्च भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाकडून पूर्णपणे उचलला जात आहे. हा सर्वसम ावेशक पाठिंबा 'खेलो इंडिया' आणि आंतरराष्ट्रीय तयारी कार्यक्रमांतर्गत क्रीडा प्रतिभांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि भविष्यातील विजेते घडवण्यासाठी सरकारच्या वचनबद्धतेला दर्शवतो. भारतीय ऑलिम्पिक संघटना आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणाने नुकताच नवी दिल्ली येथे निवड झालेल्या खेळाडूंचा भव्य सत्कार समारंभ आयोजित केला होता, ज्यात महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या सातत्यपूर्ण कठोर परिश्रमाचे आणि उत्कृष्ट कामगिरीचे विशेष कौतुक करण्यात आले.

या गौरवात आणखी भर घालताना, महाराष्ट्रातील दोन प्रशिक्षकांची ही आशियाई युवा क्रीडा स्पर्धांसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. प्रणव निवांगुणे (पुणे) आणि राजन सिंग (मुंबई उपनगर) हे पुमसे प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत. या नियुक्त्या महाराष्ट्राच्या तांत्रिक साम र्थ्यावर आणि कोचिंगमधील उत्कृष्टतेवर प्रकाश टाकतात. कारण या प्रशिक्षकांनी लखनऊ येथील साई राष्ट्रीय शिबिर दरम्यान खेळाडूंना आकार देण्यात आणि मार्गदर्शन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. हे ऐतिहासिक यश नामदेव शिरगावकर, अध्यक्ष, इंडिया तायक्वांदो यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचे फलित आहे. त्यांच्या गतिशील दृष्टिकोन, पारदर्शकता आणि दीर्घकालीन नियोजनाने भारतातील या खेळाचे स्वरूप बदलून टाकले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली, इंडिया तायक्वांदोला भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाकडून अधिकृत मान्यता मिळाली आहे आणि ऑलिम्पिक चार्टरनुसार वर्ल्ड तायक्वांदो (थेऑश्रव ढरशज्ञुपवे) सोबत संलग्नता प्राप्त झाली आहे.

भारतीय खेळाडू, प्रशिक्षक आणि प्रणाली यांचा दर्जा उंचावण्याच्या त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे, भारताच्या तायक्वांदो या खेळाच्या इतिहासात प्रथमच जगातील शीर्ष २० तायक्वांदो राष्ट्रांमध्ये आपला भारत देश गणला जातो.या यशात इंडिया तायक्वांदो चे सन्मानीय अध्यक्ष नामदेव शिरगावकर व सोबत तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (ताम) ने सुद्धा नेहमीच मोलाची भूमिका बजावली आहे. संदीप ओंबासे (अध्यक्ष), अमजदखान (गफार )पठाण (सरचिटणीस) आणि डॉ.प्रसाद कुलकर्णी (खजिनदार) यांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांच्या सांघिक कार्य, प्रशासनातील पारदर्शकता आणि मजबूत तळागाळातील विकास उपक्रमांनी राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यासाठी एक भक्कम पाया तयार केला आहे. कार्यकारिणी सदस्य तुषार आवटे, सुरेश चौधरी, घनश्याम सानप, प्रमोद दौंडे, पद्माकर कांबळे आणि नारायण वाघाडे यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याम ुळे संपूर्ण महाराष्ट्रात व्यावसायिकता आणि प्रेरणा टिकवून ठेवण्यास मदत झाली आहे. ही कामगिरी केवळ वैयक्तिक प्रतिभेचे नव्हे, तर महाराष्ट्र तायक्वांदो समुदायाच्या सामूहिक दूरदृष्टी, शिस्त आणि कठोर परिश्रमाचे प्रतिबिंब आहे.

तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, आगामी तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५, बहरीन देशासाठी साठी सर्व सहा खेळाडू आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे मनः पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा देत आहोत. हे युवा विजेते भारताचे प्रतिनिधित्व करून देशाला गौरव मिळवून देण्यास सज्ज असताना, संपूर्ण राज्य अभिमानाने आणि उत्सुकतेने त्यांच्या पाठीशी उभे आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान न दिल्यास आक्रोश मोर्चाचा इशारा



## पारनेर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तहसीलदारांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर आणि कान्हुरपठार महसूल मंडळातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना पिकाच्या नुकसानीचे अनुदान न देणे हा अन्यायकारक निर्णय असल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट), पारनेर आणि निलेश लंके प्रतिष्ठानने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने लेखी निवेदन नायब तहसीलदार दिपक कारखिले यांच्या कडे देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पारनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले आहे. शासनाच्या आदेशानुसार पंचनामे होऊन इतर भागातील शेतकऱ्यांना नुकसानीची मदत मिळण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, पारनेर महसूल मंडळ व कान्हुरपठार महसूल मंडळ या भागातील शेतकऱ्यांना पावसाचे निकष लावून पिकाच्या नुकसानीच्या अनुदानापासून वंचित ठेवले गेले आहे, जे अत्यंत चुकीचे आहे. या दोन्ही महसूल मंडळांमध्येही पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाने तहसीलदारांना विनंती केली आहे की, त्यांनी या भागातील शेतकरी बांधवांच्या नुकसानीचा सकारात्मक अहवाल शासनाकडे पाठवून सर्व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, जर दोन्ही महसूल मंडळातील शेतकऱ्यांना ८ दिवसांत नुकसानीबद्दल आर्थिक मदत मिळाली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), खा. निलेश लंके प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आणि सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने तहसील कार्यालयावरती मोठा आक्रोश मोर्चा काढण्यात येईल. याची नोंद घ्यावी, असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी दिपक लंके, कारभारी पोटघन, बाबासाहेब तरटे, संतोष खोडदे, अर्जुन भालेकर, योगेश मते, बाळासाहेब नगरे, भूषण शेलार, अमित जाधव, मारुती रेपाळे, मोहन रेपाळे, बबन डमडेरे, राहुल चेडे, प्रसाद नवले, प्रशांत बोरुडे, संदिप गाडेकर, प्रशांत साळवे, शहाजी थोरात, सुरेश झगडे, एकनाथ पवार, मयूर गायकवाड, यांच्यासह अनेक पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# दिवाळीमध्ये मध्यरात्रीची सफाई करून नमुंमपा ने केला १६ टन कचरा जमा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये विविध साहित्य खरेदीचे प्रमाण मोठे असल्याने बाजारपेठा गजबजून गेलेल्या दिसतात. त्यामुळे कचऱ्याच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे दिवाळीच्या कालावधीत वेगवेगळ्या प्रकारचे फटाके वाजवले जात असल्याने रस्त्यावरील कचऱ्याचे लक्षणीय भर पडलेली आढळून येते. या अनुषंगाने स्वच्छ शहर म्हणून असलेला नवी मुंबईचा नावलौकिक लक्षात घेता महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदशनानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दिपावली सणाच्या कालावधीत शहर स्वच्छतेवर अधिक काटेकोर लक्ष देण्यात आलेले आहे. याकरिता लक्ष्मीपूजनाच्या सणानंतर त्या रात्री म्हणजेच २१ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजल्यापासून बेलापूर ते दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात स्वच्छतेची विशेष मोहीम २२ ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजेपर्यंत राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता मोहीमेकरिता प्रत्येक विभागात



१०० ते १२५ हून अधिक स्वच्छताकर्मी यांची विशेष नेमणूक करण्यात आली होती. तसेच या स्वच्छता मोहीमेत गोळा करण्यात आलेला कचरा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहतूक करून शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी वाहून नेण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे या संपूर्ण साफसफाई मोहीमेच्या नियोजनबध्द कार्यवाहीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. त्यांनी मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्यासह विविध विभागांना भेटी देऊन ठिकठिकाणच्या स्वच्छता कामांची पाहणी केली.

शहरातील आठही विभागातील मुख्य रस्ते, वर्दळीची ठिकाणे, बाजारपेठा, मुख्य चौक अशा गजबजलेल्या ठिकाणी रात्री ११ ते पहाटे ३ या कालावधीत राबविलेल्या या विशेष साफसफाई मोहीमेमध्ये हार, फुले, खाद्यपदार्थ यांचा ६ टन ओला कचरा तसेच कागद, पुठ्ठे, कापड यांचा १० टन सुका कचरा गोळा करून तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला. सकाळी दिवस उजाडण्याच्या आत मध्यरात्रीपासून पहाटेच्या कालावधीत ही विशेष साफसफाई मोहीम राबविण्यात आल्याने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांनी स्वच्छ रस्ते, चौक पाहून या विशेष स्वच्छता मोहीमेची प्रशंसा केली. महत्वाचे म्हणजे मध्यरात्री व पहाटे ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असली तरी दररोज सकाळी होणारी साफसफाई नियमीतपणे सुरु असल्याने समाधानकारक अभिप्राय व्यक्त करण्यात आले.

# सर्वसामान्यांना कधी ही वाऱ्यावर सोडणार नाही, प्रसंगी राजकारण सोडू - सचिन वराळ पाटील

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२४, सुपा (अहिल्यानगर) :** निघोज येथील - संदीप पाटील वराळ यांनी गेल्या ११ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या गरीबांची दिवाळी हा उपक्रम सातत्याने सुरूच ठेऊ. या उपक्रमातून सर्वसामान्य लोकांची दिपावली गोड होते. यांना आम्ही कधी ही वाऱ्यावर सोडणार नाही. वेळ प्रसंगी आम्ही राजक सोडू, पण हा उपक्रम बंद होऊ देणार नाही, अशी ग्वाही संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊन्डेशन चे अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी दिली.

गरीबांची दिवाळी हा उपक्रम पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती व निघोजचे माजी सरपंच दिवंगत संदीप वराळ पाटील यांनी खिश्यात पैसा नसताना ही लोकसहभागातून गेल्या ११ वर्षापूर्वी सुरू केला. त्यानिमित्त नुकतेच निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या गरीब महिलांना एक साडी व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष सचिन वराळ पाटील पुढे म्हणाले की, या उपक्रमात कन्हैय्या परिवाराचे अध्यक्ष दिवंगत शांताराम मामा लंके यांचा सिंहाचा वाटा आहे. या उपक्रमातंगर्त आमची सर्व सामान्यांशी नाळ जोडली गेली आहे. भविष्यात ही आमचे वराळ कुटुंबीय या सर्व सामान्य लोकांबरोबर राहणार आहेत. यांना कोणालाही कसलीही अडचण आल्यास जनसेवा फाऊन्डेशनच्या कार्यालयात संपर्क साधावा. या उपक्रमाला कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचण येऊ नये , म्हणून अशी अनेक कुटूंबे आहेत की, जी निघोज मध्ये राहत नाही, पण भरीव आर्थिक मदत करतात, तर काही गुप्त मदत ही करतात. माझ्या वराळ भावकीची ही मोठी मदत असते. गावाच्या विकासात आमच्या कुटुंबाचे मोठे योगदान आहे. पत्रकार बांधव ही आपापल्या लेखनीच्या माध्यमातून प्रामाणिक मदत करतात व सर्वदूर प्रसिद्धी देण्याचे काम करतात, असे गौरवोद्गार ही सचिन वराळ



पाटील यांनी काढले आहे.

या उपक्रमाचे प्रास्ताविक मुंबई बँकेचे वरिष्ठ अधिकारी सुनिल पवार करताना म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून गरीबांची दिवाळी हा उपक्रम संदीप पाटील वराळ राबवत असे, तदनंतर सचिन पाटील वराळ हे राबवत आहे. भावाने हा सुरू केलेला उपक्रम त्यांच्या नंतर भाऊ सचिन पाटील वराळ यांनी अखंड पणे सुरूच ठेवला. जोपर्यंत सुर्य, चंद्र, तारे आहेत तो पर्यंत वराळ परिवार राहणार आहे असे गौरवोदगार ही त्यांनी काढले. तर पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे यांनी हा गरीबांची दिवाळी उपक्रम सुरू करण्यापासून ते आता पर्यंतचा ११ वर्षांचा इतिहास मांडला व वराळ परिवारा बद्दल गौरवोद्गार काढले.

यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी व निवड झालेल्या रुक्साना हवालदार यांची पोलीस दलात निवड, कराटे प्रशिक्षक ओंकार रणसिंग, कराटे खेळाडू सई राऊत, विहा लामखडे, मेथली गायकवाड, परवेझ तांबोळी, आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू आर्यन ढवळे, सागर जगताप व पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, युवक काँग्रेसचे पारनेर तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, राळेगण थेरपाळ चे सरपंच पंकज कारखिले, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मंगेश लाळगे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुकुंदराव निघोजकर यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाचे महत्व विशद केले.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या पुष्पा वराळ पाटील, सरपंच चित्रा वराळ पाटील, भाजपा चे नेते अतुलराव माने , शालेय समितीचे अध्यक्ष अप्पा वराळ, पांडुरंग गाडगे , तुकाराम येवले, राहुल वराळ, भाऊसाहेब कोल्हे, गणेश लामखडे, विशाल डेरे, फिरोज शेख, भिमराव लामखडे, अस्लम इनामदार, निलेश घोडे, श्रीकांत वराळ, शरद पवार, रामा वराळ, भास्कर वराळ, शंकर वराळ, अर्जुन वराळ, सुमन बोंबले , बॉबी ताई गायखे, ठकाराम गायखे, रवि रणसिंग, पत्रकार बांधव इतर मान्यवर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यांनी केले तर आभार यांनी मानले.

# तहसीलदार नाईकवाडे यांच्या मदतीमुळे वैष्णवीची दीपावली झाली गोड

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, विंचूर (नाशिक) :** संवेदनशील प्रशासन, समाजसेवक आणि डॉक्टरांच्या पुढाकाराने एका चिमुरडीचा जीव वाचला; आज ती ठणठणीत - आनंदाने साजरी करत आहे दीपावली.निफाड तालुक्यातील वाकद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत शिकणारी आदिवासी कुटुंबातील चिमुरडी कु.वैष्णवी लहू दळवी ही हृदयाच्या झडपेस छिद्र असलेल्या गंभीर आजाराने त्रस्त होती. आई-वडील नसल्याने ती आपल्या वयोवृद्ध आजी-आजोबांसोबत बाळू काशिनाथ दळवी व नान्याबाई बाळू दळवी यांच्याकडे राहत होती.कुटुंबाची अंत्योदय शिधापत्रिका १९९८ मध्ये निर्गमित झाली होती, मात्र ती हरवल्याने आणि ऑनलाइन नोंदणी नसल्याने वैष्णवीला आधार कार्ड मिळू शकले नव्हते. त्यामुळे शासनाच्या मोफत उपचार योजनेत ती अपात्र ठरत होती. आजार गंभीर झाल्याने गावकऱ्यांनी तिला प्रवरानगर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, आवश्यक कागदपत्रांच्या अभावी वैद्यकीय अधिकारी ऑपरेशन करण्यास धजावत नव्हते आणि वैष्णवीच्या जीवाला धोका निर्माण झाला होता.या परिस्थितीची माहिती मिळताच निफाडचे संवेदनशील तहसीलदार मा. विशाल नाईकवाडे यांच्याशी संपर्क साधून तातडीने मदतीचे आवाहन करण्यात आले. त्यांनी अत्यंत संवेदनशीलता दाखवत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून देण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर संजय गांधी निराधार योजनेतून दरमहा आर्थिक मदतीचा निर्णय ही घेतला.सामाजिक कार्यकर्ते अशोक वाळुंज यांनी तहसील कार्यालय गाठून पुरवठा अधिकारी उल्हास टर्ले यांच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून दिली. अखेर या सर्व प्रयत्नांमुळे वैष्णवीला महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजनेचा लाभ मिळाला आणि तिचे साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूट येथे यशस्वी उपचार करण्यात आले. आज वैष्णवी पूर्णपणे ठणठणीत आहे.

# थोडक्यात

## रविंद्र राजदेव मित्रमंडळाच्या वतीने भाऊबीजेचा कार्यक्रम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील नांदूर पठार येथे सोनियाताई रविंद्रशेठ राजदेव यांच्या संकल्पनेतून आणि रविंद्रशेठ राजदेव मित्र मंडळाच्या वतीने भाऊबीजेचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला गावातील माता-भगिनींनी भरघोस प्रतिसाद देत उत्साहात सहभाग घेतला. भाऊबीजेच्या निमित्ताने बंधू-भगिनींच्या प्रेमळ नात्याचा उत्सव साजरा करताना उपस्थित महिलांना आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन नांदूर पठार येथील मुख्य सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने आणि मंगलमय वातावरणात झाली. सोनियाताई रविंद्रशेठ राजदेव यांनी उपस्थितांना भाऊबीजेचे महत्त्व आणि भावंडांमधील नात्याची गोडवा याविषयी मनोगत व्यक्त केले. त्यांनी या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, समाजातील प्रत्येक महिलेला सन्मान आणि आनंद मिळावा, हाच या आयोजनाचा मुख्य हेतू आहे. कार्यक्रमात उपस्थित प्रत्येक महिलेला भाऊबीजेच्या निमित्ताने खास भेटवस्तू देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. मित्र मंडळाच्या सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. गावातील ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. सोनियाताई रविंद्रशेठ राजदेव यांनी आपल्या भाषणात सांगितले, भाऊबीज हा केवळ सण नाही, तर भावंडांमधील प्रेम आणि विश्वासाचा उत्सव आहे. आम्ही यापुढेही असे सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित करत राहू. कार्यक्रमाला उपस्थित महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आयोजकांचे आभार मानले. या कार्यक्रमाने नांदूर पठार गावात भाऊबीजेचा उत्साह द्विगुणित होऊन सामाजिक एकतेचे दर्शन घडवले.

## दिवाळी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक महाबळेश्वर येथे दाखल



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२४, महाबळेश्वर (सातारा) :** महाराष्ट्राचे नंदनवन तसेच थंड हवेचे प्रसिद्ध असे पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ असलेल्या महाबळेश्वर येथे सलग आलेल्या दिवाळी सुट्टीमुळे महाबळेश्वर पाचगणी हाऊसफुल्ल झाले आहे. दिवाळी सुट्टीत राज्या बरोबरच परराज्यातील पर्यटकांनीही मोठी गर्दी केली आहे. मिनी बसेस व इतर खाजगी वाहनांच्या मोठ्या गर्दीमुळे या परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमडून गेली आहे. पर्यटकांची आवक वाढल्याने महाबळेश्वर पाचगणीतील लॉजेस हॉटेल, बंगले बुक झालेले आहेत. दिवाळीनिमित्त आलेल्या सलग सुट्टीचा पुरेपूर आनंद लुटण्याच्या निमित्ताने महाबळेश्वर, पाचगणी या पर्यटनस्थळांना यात्रेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. महाबळेश्वरातील सर्व पॉइंट्स व निसर्गसौंदर्याचा पुरेपूर आनंद पर्यटक मित्र मंडळ व परिवारासह लुटत आहेत. महाबळेश्वर बाजारपेठ पर्यटकांच्या स्वागता करिता सज्ज झाली आहे. खरेदी करिता पर्यटकांची मोठी गर्दी झाली आहे. महाबळेश्वर येथिल प्रसिद्ध चने, शेंगदाणे तसेच विविध फळांचे जाम, जेली, सिरप, चिक्की, फज तसेच, चप्पल, बूट व लाकडी वस्तू तसेच विविध आकर्षिक प्रकारच्या वस्तू आपल्या परिजन व मित्रपरिवारा करिता खरेदी करण्यासाठी येथील बाजारपेठही पर्यटकांनी बहरलेली दिसत आहे. वाढलेल्या गुलाबी थंडीमुळे पर्यटकही सुखावले आहेत. पाचगणी टेबललँडला पर्यटकांची गर्दी झाली आहे. या ठिकाणी असणाऱ्या गुहेत तसेच घोडेसफारीचा आनंद पर्यटक घेताना दिसत आहेत महाबळेश्वरच्या वेण्णा लेकवर बोटींगसाठी पर्यटकांच्या मोठया रांगा लागल्या दिसत आहेत क्षेत्र महाबळेश्वर, प्रतापगड, केट्स, आर्थरसिट, बॉम्बे पॉईटसह, फेसाळणारा लिंगमळा वॉटर फॉल तसेच अनेक ठिकाणी पर्यटक हिरव्यागार निर्सगाचा व गुलाबी थंडीचा आनंद घेताना पर्यटक दिसत आहेत. गरम गरम भाजलेले मक्याचे कणीस, मकई पॅटीस स्ट्रॉबेरी व इतर खादयपदर्थाचा अस्वाद घेताना पर्यटक दिसत आहे तसेच घोडे स्वारीसह वेण्णा लेक व तापोळा येथे नौका विहाराचा आनंद घेत आहेत.

रस्त्याला होणाऱ्या दुर्तफा वाहनाच्या ट्राफीक जामचा फटका सर्वांनाचा बसत आहे. गुरेघरपासून वेण्णा लेकपर्यंत आणि महाबळेश्वर परिसरामध्ये वाहनांच्या मोठमोठाल्या (किमान ८ ते १० किमी) रांगा लागल्या आहेत. मिनी काश्मीर म्हणून प्रसिद्ध असलेल्या तापोळा येथे पर्यटकाची गर्दी पहायला मिळत आहे. या दिवाळी सुटीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांनी महाबळेश्वर येथील नयनरम्य परिसरात निसर्गाचा आनंद लुटत आहेत. अचानक येणाऱ्या पावसामुळे पर्यटक आनंदी झाले असून गुलाबी थंडी व पावसाचा आनंद घेत आहेत पर्यटकांची आवक वाढल्याने वाहतुकीची कोंडी झाल्याने मोठया प्रमाणात ट्राफिक जाम होत आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत. अशी मागणी पर्यटक व स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## रानगव्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२३, सातारा :** महाबळेश्वर तालुक्यातील सोनाट गावात आज सकाळी झालेल्या रानगव्याच्या प्रचंड हल्ल्यात राघू जानू कदम (वय अंदाजे ५०) या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. या दुःखद घटनेमुळे परिसरात भीतीचे तसेच वनविभागाच्या निष्क्रिय कारभाराबद्दल तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राघू कदम हे दररोजप्रमाणे सकाळी आपल्या शेतात शेतीची कामे करण्यासाठी गेले होते. दुपारी ते परत न आल्याने काही नागरिकांनी शेतात जाऊन पाहणी केली असता त्यांना राघू कदम शेतात मृत अवस्थेत आढळले. प्राथमिक तपासात रानगव्याने अचानक हल्ला करून जोरदार धडक दिल्याने त्यांच्या छातीत शिंग आरपार गेल्याचे समोर आले आहे. हल्ला इतका भीषण होता की घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तापोळा पोलीस ठाण्याचे कर्मचारी आणि वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

पंचनामा करून मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला आहे. मात्र, या घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाच्या कारभारावर जोरदार टीका केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून सोनाट, तापोळा, आंबेनळी परिसरात रानगवे, रानडुक्कर यांच्या हल्ल्याचे प्रमाण वाढले असून, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांनी अनेक वेळा वनविभागाकडे लेखी तक्रारी करून गस्त वाढविणे, सापळे लावणे, आणि नुकसानभरपाई देण्याची मागणी केली होती. परंतु, विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा ग्रामस्थांचा आरोप आहे.